अंक – ४ था

दिनांक :–
२५ जानेवारी २०२१

# सायबर सारथी

(साप्ताहिक माहितीपत्र)

## सायबर सेल

गुन्हे शाखा
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

# सायबर गुन्हेगार आणि ब्लॅकमेलिंग




सायबर गुन्हेगार नागरिकांना ब्लॅकमेल करण्यासाठी नवीन नवीन फंडे आजमावत आहेत तसेच या गुन्ह्यांना बळी पडणाऱ्यांची संख्याही तशीच आहे. नुकत्याच झालेल्या तपासादरम्यान सायबर सेल गुन्हे शाखा पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या असे निदर्शनास आले कि, इंटरनेट च्या सक्रिय वापरामुळे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर लोकांना फसवून त्यांचे मोबाईल नंबर घेऊन त्यांना ब्लॅकमेल केले जाते आणि पैसे उकळले जातात.

# अश्लील व्हिडिओ बनवून ब्लॅक मेल करणे!



सोशल मीडियावर होणाऱ्या अनेक फसणूकी आपल्या समोर आल्या आहेत पण हि वेगळ्याच प्रकारची फसवणूक आहे आणि आजच्या अंकाच्या माध्यमातून सायबर सेल गुन्हे शाखा पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय नागरीकांना सावधान करत आहे.

सायबर गुन्हेगार फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर, व्हाट्सअप अशा प्रकारच्या सोशल मीडिया वर फेक अकाउंट तयार करून विशेषतः पुरुषांना बळी पाडत आहेत. पुरुषांना मुलीच्या नावाने फ्रेंड रिक्वेस्ट सेंड केली जाते. त्यांनी ते एक्सेप्ट केल्यानंतर त्यांच्याशी महिला/ मुली चॅटिंग करतात आणि याच माध्यमातून सक्रिय असलेल्या मोबाइल क्रमांकाची देवाण-घेवाण केली जाते. व्हाट्सअप वर कनेक्ट झाल्यानंतर सायबर गुन्हेगारांद्वारे व्हिडिओ कॉल केला जातो. व्हिडिओ कॉल स्वीकारताच ती तरुणी/ महिला आपला चेहरा न दाखवता तिच्या अंगावरील कपडे काढत असल्याचे दिसते आणि निर्वस्त्र होते आणि कॉल करणारी महिला तिच्या हालचालींद्वारे समोर असणाऱ्या व्यक्तीलाही निर्वस्त्र होण्यास परावृत्त करते. या सर्व घडत असलेल्या प्रकाराची अश्लील हालचालींसोबत व्हिडिओ स्क्रीन रेकॉर्डिंग केली जाते. या नंतर सायबर गुन्हेगार संबंधित व्यक्तीला तो व्हिडिओ सोशल मीडियावर वर कनेक्ट असणाऱ्या लोकांमध्ये व्हायरल करण्याची धमकी देऊन पैसे उकळतात. सुरुवातीला थोडेसे पैसे मागून सायबर गुन्हेगार ती व्हिडिओ क्लिप नष्ट करू असे सांगतात पण असे न करता पीडित व्यक्तीला पुन्हा पुन्हा त्या क्लिपच्या आधारे पैसे मागितले जातात आणि बदनामी होण्याच्या भीतीने पीडित व्यक्ती पेटीएम द्वारे पैसे पाठवतो.

# सावधगिरीचे उपाय




- सोशल मीडिया वर अनोळखी व्यक्तींची योग्य पडताळणी केल्याशिवाय फ्रेंड रिक्वेस्ट एक्सेप्ट करू नका.
- सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींसोबत आपला सक्रिय असलेला मोबाईल क्रमांक शेअर करू नका.
- व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम यांसारख्या सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींकडून येणारे व्हिडिओ कॉल स्वीकारू नका.
- अनोळखी व्यक्तीकडून व्हाईस कॉल आला असेल आणि नंतर व्हिडिओ कॉल ची रिक्वेस्ट येत असेल तर ते स्वीकारू नका.
- असा प्रकार तुमच्या जवळपास कुठेही घडत असेल तर सायबर सेल गुन्हे शाखा पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांच्याशी संपर्क साधा.

# सावध व्हा, सुरक्षित रहा

अधिक माहिती करिता संपर्क -

## सायबर सेल

गुन्हे शाखा,
पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालय

**Mail- cybercell.pcpc-mh@mahapolice.gov.in**
**Contact No.- 020- 27350939**